Q. 2 समता म्हणजे काय ते सांगून प्रकार विषद करा

1) प्रस्तावना -

सर्वांना समान संधी देणे म्हणजे समता होय. स्वातंत्र्याप्रमाणेच समता लोकशाहीचे एक आधारभूत तत्व आहे. लोकशाहीचा पाया आहे. समतेशिवाय लोकशाहीचा विचार करता येत नाही. समाजामध्ये समतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी समाजातील विषमता दूर करण्यासाठी अनेक विचारवंतानी प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्याप्रमाणेच समतेसाठी अमेरिकन, फ्रेंच, रशीयन क्रांती झाली आहे. व्यक्तीच्या विकासासाठी, कल्याणासाठी समाजामध्ये समतेचे वातावरण असले पाहिजे.

2) समतेचा अर्थ व व्याख्या -

समता म्हणजे व्यक्तिला जे अधिकार किंवा स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे ते कोण-त्याही प्रकारचा भेदभाव न करता देणे होय. तसेच जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत, श्रीमंत-गरीब, काळा-गोरा असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी देणे म्हणजे समता होय. थोडक्यात दर्जाची व संधीची समानता म्हणजे समता.

1) डी. डी. रफेल -

समता म्हणजे आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सर्व लोकांना समतेचा अधिकार देणे होय.

Scanned with CamScanner

ii) लास्की मते,

समता म्हणजे समाजात कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा विशेषाधिकार नसणे होय

समता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपली योग्यता दाखविण्याची तसेच आपल्या शक्तीचा उपयोग करण्याची पूर्ण संधी उपलब्ध असणे होय.

iii) बार्करच्या मते

बार्करनी समतेचा असा अर्थ सांगितला आहे की, अधिकाराच्या स्वरुपात मला ज्या सोई प्राप्त होतात, त्याच सोयी त्याच प्रमाणात दुसऱ्या व्यक्तीलाही प्राप्त व्हाव्यात तसेच दुसऱ्याला जे अधिकार प्राप्त झाले आहेत ते मलाही प्राप्त झाले पाहिजे.

3) व्याख्येवरून निष्कर्ष

1) व्यक्तीला समान संधी देणे
2) समाजातील विशेष पदव्या-अधिकार नष्ट करणे
3) कायदयासमोर सर्वांना समान लेखणे
4) अधिकार आणि स्वातंत्र्य सर्वांना समान देणे.
5) जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत इत्यादींच्या आधारावर भेदभाव न करणे.

4) समतेचे प्रकार

1) नैसर्गिक समता-

नैसर्गिक समता म्हणजे निसर्गाने सर्व व्यक्तींना समान निर्माण केले आहे. तसेच

त्यांना समान गुणांची देणगी दिली आहे. प्रत्येकाला विचार, शक्ती, भावना दिली आहे. यामुळे समाजाने किंवा राज्याने व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेदभाव करू नये. व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेदभाव करणे नैसर्गिक समतेच्या विरुद्ध आहे.

2) नागरी समता / सामाजिक समता-

समाजातील व्यक्तींना किंवा नागरिकांना जे स्वातंत्र्य दिले आहे ते सर्वांना समान दिले पाहिजे. कायद्यासमोर सर्वांना समान लेख्या जाते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्वातंत्र्य किंवा व्यक्तीस्वातंत्र्य सर्वांना समान दिले आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही.

3) राजकीय समता-

राजकीय समता म्हणजे व्यक्तीला जे अधिकार किंवा राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे, ते कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान देणे, म्हणजे राजकीय समता होय. जात, धर्म, वंश, याचा विचार न करता सर्वांनाच मतदानाचा, निवडणुक लढविण्याचा, सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे.

4) आर्थिक समता-

आर्थिक समता म्हणने मानवाकडून मानवाचे आर्थिक शोषण, आर्थिक पिळवणुक होऊ नये. प्रत्येकाच्या मुलभूत गरजा पूर्ण झाल्या

पाहिजे. प्रत्येकाला काम मिळाले पाहिजे. कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. समाजातील आर्थिक विषमता दूर झाली पाहिजे.

5) शैक्षणिक समता-

शैक्षणिक समता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची संधी उपलब्ध झाली पाहिजे. त्यामध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना शैक्षणिक स्वातंत्र्य असले पाहिजे.

अशाप्रकारे समतेचा उल्लेख करता येईल.

Scanned with CamScanner